माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /६०२३/२०२३/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| श्रीम. रंजना सुरेश दरवडे | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय शिक्रापूर, ता. शिरुर, जि. पुणे | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे |

**( सुनावणी दिनांक- ०६/०५/२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २७/०९/२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये मुदतीत माहिती दिली नाही, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०६/०६/२०२३ | दि. १ जानेवारी २०१६ ते ६ जून २०२३ या कालावधीतील ग्रामपंचायत शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे हद्दीतील शेतजमीन मिळकत गट क्र. ३२०/१ वर बांधकाम करण्यात आलेल्या सदनिकांचे अथवा इमारतींचे बांधकाम करण्यासाठी परवाना प्राप्त करण्याच्या हेतून बांधकामकर्त्यांनी ग्रामपंचायतीकडे केलेल्या अर्जाची व ग्रामपंचायतीने सदर बांधकामकर्त्यांना जारी केलेल्या बांधकाम परवान्यांच्या पानांची प्रत इ. माहिती |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहती अधिकारी यांनी आयोगामोर अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिलीय आदेशानुसार दि. १२/०९/२०२३ रोजी ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे.

उपलब्ध अभिलेखावरुन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय शिक्रापूर, ता. शिरुर, जि. पुणे यांनी अपिलार्थीस दि.१२/०९/२०२३ रोजी उत्तर पाठविल्याचा पोस्टाचा पुरावा

आयोगास सादर केला आहे.  तसेच दि. ३०/०४/२०२५ रोजी अपिलार्थीस माहिती सदर्भात वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविल्याचे दिसून येते.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

प्रस्तुत द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ /६०२३/२०२३/पुणे/7908/2025 दिनांक - 21/7/2025